ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 12 | AUGUST - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# "डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची समता व राष्ट्रीयता"



**डॉ.जगदीश द.हेंडवे**
**इतिहास विभाग प्रमुख,**
**बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय ,पारवा.**
**ता.घाटंजी जि.यवतमाळ.**

2024-25 हे वर्ष संविधान निर्मितीचा अमृतमहोत्सवी वर्ष होते. संविधान निर्मितीच्या जागराच्या निमित्ताने सबंध देशभर अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ दलितांचे नेते नव्हते तर त्यांनी जे कार्य केले त्यातून आपल्याला बाबासाहेब एक राष्ट्रपुरुष होते असे निश्चितपणे म्हणता येते. बाबासाहेबांचा जन्म 14 एप्रिल 1891 रोजी मध्यप्रदेशातील महू या ठिकाणी झाला. त्यांचे मूळ गाव रत्नागिरी जिल्ह्यातील अंबावडे हे आहे. रामजी सकपाळ व भिमाबाई या दांपत्याच्या पोटी त्यांचा जन्म झाला. या दाम्पत्यांना एकूण 14 मुले झाली .आंबेडकर हे चौदावे रत्न होते. आंबेडकरांचे वडील इंग्रजांच्या सैन्यामध्ये नायक पदावर होते. सेवानिवृत्त झाल्यानंतर ते अंबावडे इथं वास्तव्यास आले आणि मुलांच्या शिक्षणाची तजवीस त्यांनी केली. बाबासाहेबांचे प्राथमिक शिक्षण प्रताप महाविद्यालय सातारा या ठिकाणी झाले .मुलाच्या शिक्षणाची आभाळ होऊ नये म्हणून रामजी बाबांनी आपलं कुटुंब मुंबईला हलवले .आंबेडकर मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयात बीए झाले. त्यानंतर उच्च शिक्षणसाठी ते इंग्लंड ,अमेरिका या ठिकाणी गेले. त्यांनी आपले उच्च शिक्षण एम. ए, एलएलबी ,पीएचडी, डिलीट हे सर्व पाश्चिमात्य देशात पूर्ण केले .बाबासाहेब विद्याविभूषित झाल्यानंतर 1916 साली भारतामध्ये परत आले. त्यांना सहज कुठली तरी नोकरी मिळाली असती .पण त्यांनी आपल्या समाज बांधवांच्यासाठी स्वतःला सर्मपित केले .अस्पृश्यांचे व दलितांचे प्रश्न वेशीवर टाकण्यासाठी बाबासाहेबांनी अनेक वृत्तपत्र सुरू केली. मूकनायक, बहिष्कृत भारत ,जनता ,प्रबुद्ध भारत ही त्यातली काही ठळक वृत्तपत्र आहे. या वृत्तपत्राच्या माध्यमातून बाबासाहेबांनी अस्पृश्य समाजाचे व दलितांचे प्रश्न वृत्तपत्रातील लेखणीच्या साहाय्याने लोकांच्या समोर मांडले.

## ग्रंथसंपदा-

वैचारिकता ,लेखन, वाचन, कृती आणि प्रामाणिकता व चारित्र्य या शक्ती ज्यांच्याजवळ असतात तेच क्रांती करू शकतात हा इतिहास आहे. डॉ. बाबासाहेबाजवळ या सर्व शक्ती होत्या नाही त्यांनी त्या जिद्दीने ,अपार कष्टाने प्राप्त केल्या. त्यांनी वैचारिकतेला लेखणीची,लेखणीला वाचेची, वाचेला कृतीची व या सर्वांना प्रामाणिकतेची जोड दिली .म्हणूनच कर्मकांडाने, अंधश्रद्धेने विषमतेने पोखरलेल्या समाजाला धक्का देऊन नव समाज निर्माण करण्याचे क्रांतिकारक कार्य डॉ.बाबासाहेब करू शकले. त्यांना वाचनाचा दांडगा व्यासंग असून

लिखाणाचाही होता. त्यांनी विपुल प्रमाणात विद्वत्ता पूर्ण ग्रंथाची निर्मिती केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ग्रंथ वेडे होते. बाबासाहेबांचे लेखन साहित्यात त्यांनी लिहिलेले ग्रंथ, पुस्तके ,प्रबंध ,लेख, भाषणे, स्फुटलेख , पत्रे, वर्तमानपत्रे इत्यादींचा समावेश होता .भारतातील कोणत्याही राजकीय नेत्याने केले नाही तेवढे लेखन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आहे. डॉ. बाबासाहेब हे बहुमुखी प्रतिभाशाली होते .ते मराठी, संस्कृत ,पाली, इंग्रजी, गुजराती, जर्मन, कन्नड ,बंगाली व पारशी या भाषा जाणणारे विद्वान होते. त्यांनी आपल्या लेखनातून धर्म सुधारणा व समाज सुधारणा याकडे प्रामुख्याने लक्ष दिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहुतेक लिखाण इंग्रजीमध्ये असले तरी त्यांच्या विचारावर आधारित अनेक मराठी पुस्तके प्रकाशित झाली आहेत .त्यांच्या लिखाणातून त्यांचे सखोल ज्ञान आणि दूरदृष्टी प्रकाशाने दिसून येते. बाबासाहेबांची ग्रंथसंपदा विपुल प्रमाणात असून त्यात अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र या विषयावरील अनेक पुस्तके ,प्रबंध आणि लेख याचा समावेश आहे. "द प्रॉब्लेम ऑफ द रुपी" 1923 , "अँनहिलेशन ऑफ कास्ट" 1936, "पाकिस्तान ऑफ द पार्टिशन ऑफ इंडिया" 1940 ,आणि " The Evolution of Provincial finance in British India"1935 , "व्हिच वेळ टू इमॉन्सिपेशन फेडरेशन वर्सेस फ्रीडम", रानडे ,गांधी अँड जिना, द कॅबिनेट मिशन अँड अनटचेबल ,राज्य आणि अल्पसंख्यांक ,अस्पृश्य पूर्वी कोण होते, बुद्ध आणि त्यांचा धम्म याशिवाय अनेक पुस्तके त्यांनी लिहिले आहेत. असा ग्रंथ प्रेमी वेडा माणूस जगात दुर्मिळच आहे.

## लोक चळवळी -

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य हे हिंदू धर्माचे अनुयायी असल्यामुळे स्पृश्या प्रमाणे अस्पृश्य व दलितांनाही सामाजिक ,धार्मिक हक्क व अधिकार मिळाले पाहिजे. यासाठीच त्यांनी महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह, काळाराम मंदिर सत्याग्रह , मनुस्मृति दहन यासारख्या लोकचळवळी उभारून अस्पृश्य व दलितांना न्याय, हक्क आणि अधिकार मिळून दिले .त्यामुळे अस्पृश्य समाजात स्वाभिमानाचे तेज निर्माण झाले. या लोक चळवळीतून हजारो कार्यकर्ते निर्माण झाले. अस्पृश्यता विरोधी आंदोलन कायद्याच्या चौकटीत राहून कसा यशस्वी करता येतो याचा वस्तुपाठ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगाला घालून दिला.

## महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह -

सापांना प्रेमाने दूध पाजणाऱ्या भारतीय संस्कृतीत मात्र माणसाला सन्मानाने पाणी सुद्धा मिळत नव्हते.पशु,पक्षी, जनावरे सार्वजनिक तळे, विहिरीवर मुक्तपणे पाणी पीत होते. मात्र अस्पृश्य दलितांना येथील पाण्याला सुद्धा स्पर्श करू दिला जात नव्हता .त्यांना या सर्व ठिकाणी पाणी पिण्यास सक्त बंदी होती .भारतीय संस्कृतीत माणसाला पाण्यासाठी संघर्ष करावा लागला याचा प्रारंभ महाड चवदार तळ्याच्या सत्याग्रहापासून झाला.

ब्राह्मणेत्तर पक्षाचे नेते सी. के. बोले यांनी 4 आगस्ट 1923 रोजी मुंबई प्रांताच्या कायदेमंडळात एक ठराव मंजूर करून घेतला. अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या सर्व जातीच्या लोकांना सार्वजनिक पाणवठे विहिरी, धर्मशाळा याचा उपयोग करू दयावा. तसेच शाळा, दवाखाने, कार्यालय, न्यायालय इत्यादी ठिकाणी त्यांना प्रवेश नाकारू नये अशा आशयाचा तो ठराव होता. त्यानुसार महाडचे तत्कालीन नगराध्यक्ष सुरेंद्रनाथ गोविंदराज टिपणीस यांनी महाडचे सार्वजनिक पाणवठे सुरू केले होते. पण प्रत्यक्षात तसे घडून आले नाहीत. महाडच्या तळ्यावर पाणी पिण्याचे साहसाही कोणी दाखवले नव्हते. तेव्हा डॉ. बाबासाहेबांनी अस्पृश्य दलितांमध्ये आत्मविश्वास, हक्क मिळण्याकरीता संघर्ष ,जिद्द निर्माण करण्यासाठी 19 व 20 मार्च 1927 रोजी परिषद आयोजित केली. डॉ. बाबासाहेबांनी या परिषदेला उद्बोधन केले. आमच्यावर होणारा अन्याय आम्ही मुकाट्याने सहन करणार नाही.

बाबासाहेबांच्या समारोपिय भाषणानंतर अनंत विनायक चित्रे यांच्या सूचनेवरून बाबासाहेबांनी परिषदेच्या सर्व प्रतिनिधीसह महाडच्या चवदार तळ्यावर जाऊन सी.के. बोले यांच्या प्रस्तावाची अंमलबजावणी केली .डॉ बाबासाहेबांनी चवदार तळ्याचे पाणी प्राशन केले आणि मानव मुक्तीच्या क्रांतीचा हा कृती रूपाने केलेला प्रारंभ होता.

### मनुस्मृतीचे दहन -

प्राचीन काळापासून तर आधुनिक काळापर्यंत भारतीय समाजव्यवस्थेत बहुजन समाजाचे शोषण करण्यात आले .भारतीय समाज व्यवस्था विषमतेवर आधारित होती. माणसाला माणूस म्हणून जगण्याचा कोणताही अधिकार नव्हता. हा अधिकार ज्या ग्रंथाने नाकारणारा तो ग्रंथ म्हणजे मनुस्मृति होय. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी महाडच्या परिषदेत मनुस्मृतिचे दहन करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 25 डिसेंबर 1927 रोजी मनुस्मृतीचे दहन केले .मनुस्मृतित असलेल्या जातीभेद आणि अस्पृश्यतेवर आधारित अन्यायकारक नियमांचा निषेध करण्यात आला. बहुजन समाजाच्या विकासातील अडसर असलेला हा ग्रंथ म्हणजे मनुस्मृति जाळून बाबासाहेबांनी विकासाचे नवपर्व निर्माण केले. याविषयी धनंजय कीर लिहितात , "25 डिसेंबर 1927 हा भारताच्या इतिहासातील एक अत्यंत क्रांतिकारक दिवस गणला जाईल. या दिवशी बाबासाहेबांनी मनुस्मृति जाळून हिंदूंच्या सामाजिक पुनर्रचनेला उपयोगी पडेल अशा नव स्मृतीची मागणी केली."

### काळाराम मंदिर सत्याग्रह -

हिंदूंच्या मंदिरामध्ये हिंदू असतानाही अस्पृश्यांना प्रवेश नव्हता .अस्पृश्यांनी मूर्तीला स्पर्श केला तर मूर्तीचे पावित्र नष्ट होते, अधर्म वढवतो अशी प्रथा, परंपरा असल्यामुळे सवर्णानी अस्पृश्यांना, दलितांना मंदिरात प्रवेश नाकारला. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नाशिकच्या काळाराम मंदिर सत्याग्रहाचे नेतृत्व स्वतः केले .

3 मार्च 1930 ला नाशिक शहरातील थोरल्या महारवाड्यातून सत्याग्रहाची मिरवणूकने प्रारंभ झाला.दादासाहेब गायकवाड ,अमरुतराव रणखांबे, डी .एन. पगारे, भालेराव बर्वे इत्यादीसह असंख्य अनुयायी काळाराम मंदीर सत्याग्रह सहभागी झाले .या अनुयायांसमोर समतेचा विचार स्पष्ट करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, 'मंदिर प्रवेशाने तुमचा प्रश्न सुटेल असे मुळीच म्हणता येणार नाही. आपल्या प्रश्नाचे स्वरूप व्यापक आहे .आजचा आपला काळाराम मंदीर सत्याग्रह हे उच्चवर्णीय हिंदू मनास एक प्रकारचे आवाहन आहे.आम्ही उच्च वर्णीय हिंदू मनाची परीक्षा घेत आहोत .आम्हास माहित आहे दगडाचा देव आहे ,त्याचे दर्शन झाल्याने व त्याची पूजा केल्याने आमचा सर्वस्वी प्रश्न सुटणार नाही .आमचा सत्याग्रह हा हिंदूंच्या मनात बदल आणण्याचा आहे." हा सत्याग्रह 1935 पर्यंत सुरू होता.

काळाराम मंदिर सत्याग्रह हा 3 मार्च 1930 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली नाशिकच्या काळाराम मंदिरात अस्पृश्य लोकांना प्रवेश मिळावा यासाठी सुरू झालेला एक ऐतिहासिक लढा होता .या सत्याग्रहाचा उद्देश केवळ मंदिर प्रवेश नव्हता तर मानवी हक्क, न्याय आणि समानता प्रस्थापित करणे हा होता.

### बौद्ध धम्माचा स्वीकार -

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्मातील अंधश्रद्धा, विषमता समूळ नष्ट करण्यासाठी व समतावादी वैज्ञानिक दृष्टिकोन समाजात रुजविण्याकरिता सतत प्रयत्न केले. भारतीय सवर्णांनी आंबेडकरांना सतत विरोध केला .भारतीय समाज व्यवस्थेत माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार नव्हत . भारतीय समाजव्यवस्थेत

माणसाला माणूस पाहण्याची दृष्टी हिंदू समजल्या जाणाऱ्या सुवर्णान जवळ नव्हती. म्हणून आंबेडकरांनी अंतिम निर्णय घेतला की, हिंदू धर्मात राहून आपल्या समाज बांधवांच्या स्थितीत कोणताही बदल होणार नाही. धर्म परिवर्तन हा शोषित, पिडित लोकांच्या विकासाचा मार्ग आहे. डॉ. आंबेडकरांनी 13 ऑक्टोबर 1935 ला येवले येथे हिंदू धर्मा त्यागाची भीमप्रतिज्ञा घेतली आणि 14 ऑक्टोबर 1956 रोजी नागपूर येथे लाखो अनुययांसह ती पूर्ण केली. डॉ. आंबेडकरांनी ज्या बौद्ध धम्मात प्रवेश केला तो हिंदूना अभिप्रेत असलेल्या बौद्ध धर्मापेक्षा वेगळा होता. तसा तो बौद्धांना अभिप्रेत असलेल्या पारंपारिक बौद्ध धर्मापेक्षाही वेगळा होता. डॉ. बाबासाहेबांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली आणि उपेक्षितांच्या विकासाचे एक अभिमानास्पद पर्व सुरू झाले. धर्मांतराची ही घटना दिन दलितांच्या अस्मितेचे स्फुल्लिंग चेतवणारी तर होतीच, पण त्यांच्या राष्ट्रप्रेमाचेही ते एक अजोड उदाहरण होते.

## संविधान निर्मितीचे कार्य -

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही घटना परिषदेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष होते. घटना परिषदेच्या प्रथम सभासदांपैकी आंबेडकर एक होते .पण आंबेडकर ज्या मतदारसंघातून घटना समितीवर निवडून आले होते तो मतदार संघ फाळणीनंतर पाकिस्तानात गेल्याने त्यांचे सभासदत्व समाप्त झाले घटना समिती ही सर्व विचारांचे प्रतिनिधित्व करणाऱ्यांची असावी.या हेतूने काँग्रेसने बाबासाहेबांनी मुंबई राज्यातून पुन्हा परिषदेवर निवडून आणले बाबासाहेब हे काँग्रेस पक्षाचे टीकाकार व राजकीय विरोधक म्हणून प्रसिद्ध होते. त्यामुळे आपली मसुदा समितीचे अध्यक्ष पदी निवड झाली याबद्दल डॉ. आंबेडकरांना स्वतः आश्चर्य वाटले. घटना मसुदा समितीत सात सदस्य होते .परंतु घटनेच्या मसुद्या बाबतची सर्व जबाबदारी बाबासाहेब आंबेडकरांना पार पाडावी लागली.

श्री . टी.टी. कृष्णाचारी यांनी आपल्या भाषणात हमाल मुद्दा स्पष्ट केला. ते म्हणाले मसुदा समितीच्या सहा सदस्य सभासदांपैकी एकाने राजीनामा दिला, तर एका सभासदांचे निधन झाले ,एक अमेरिकेत होते, आणि एक सभासद राजकारणात असल्यामुळे ते वेळ देऊ शकले नाही. शेवटी घटना मसुदा तयार करण्याचे सर्व कार्य बाबासाहेब आंबेडकरांनाच करावे लागले. भारतात व भारतीय लोकमनाला डॉ. बाबासाहेबांचे ऋण मान्य करावेच लागेल. असे असली तरीही एका राष्ट्राच्या राज्यघटनेत त्या राष्ट्राच्या सामाजिक आकांक्षा, प्रेरणा आणि गरजा प्रतिबिंबित व्हाव्या लागतात. घटना तयार करणे ही एक प्रक्रिया आणि त्या प्रक्रियेत अनेकांचा सहभाग असणे अनिवार्य असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून संबोधले जाते.कारण भारतीय संविधान निर्मितीत डॉ.बाबासाहेबांचा सिंहाचा वाटा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थशास्त्रज्ञ होते तसेच निष्णात कायदेपंडित होते . बाबासाहेब संविधानाची जबाबदारी पार पडत असताना त्यांनी तिन्ही भूमिकेचे मिश्रण त्यांच्या नेतृत्वात झालेले दिसून येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाचे शिल्पकार प्रचंड कार्य केले. त्यांनीच राष्ट्राच्या लोकशाहीचा पाया मजबूत करण्यासाठी राज्यघटना निर्माण केली. त्यांनी समाजातील दलित व मागासलेल्या, पीडितांना त्यांचे हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी सतत झटत राहिले नव्हे आपले संपूर्ण जीवन समर्पित केले .स्त्रियांच्या हक्कासाठी त्यांनी हिंदू कोड बिलासारख्या सुधारण्यासाठी लढा दिला. प्रसंगी त्यांनी कायदेमंत्री पदाचाही त्याग केला .त्यांनी भारतीय समाजात समता प्रस्थापित केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे संपूर्ण जीवन आपल्याला प्रेरणा देते की, कोणत्याही परिस्थितीत ज्ञानाचा आणि मानवतेचा मार्ग सोडू नये. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन समाजातील वाईट प्रथापरंपरेविरुद्ध लढण्यासाठी आणि समता, स्वातंत्र्य ,न्याय ,बंधुता प्रस्थापित यासाठी प्रयत्न करणे हेच डॉ. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाण दिनी खरी आदरांजली ठरेल.

**संदर्भ –**


१.संपादक मंडळ-दया पवार -डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ - महारष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ , मुंबई - १९९३ .

२.धनंजय कीर- डॉ.बाबासाहेब आंबेडकर -पॉप्युलर प्रकाशन मुंबई.

३.संपादक डॉ.गजानन लोहवे - डॉ.बाबासाहेब आंबेडकरवर्तमान संदर्भात -सुधीर प्रकाशन वर्धा.

४.ज.वि.पवार- डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा धम्म प्रवास व भारतीय संविधान -सूर्यमुद्रा प्रकाशन ,नांदेड.

५.डॉ.ज्ञानराज का.गायकवाड -महामानव डॉ.भीमराव रामजी आंबेडकर -रिया पब्लिकेशन कोल्हापूर.